शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजना- सुधारित नियम.

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग,
शासन निर्णय क्र. एससीएच १०८२/४१९९/विशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : १३ ऑगस्ट, १९८५.

संदर्भ :- १] शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक: जीआरएफ १०८२/३९७११/२१, ई, दिनांक १३.१२.८२.

२] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक : एसईए १०८२/ ४१९९/ विशि-३, दिनांक २.१.८५.

शासन निर्णय :- शासकीय महाविद्यालये व राज्यातील विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये यामधील विद्यार्थ्यांकरिता शासनाने एकूण १४ संशोधन अधिछात्रवृत्त्या मंजूर केलेल्या आहेत. या अधिछात्रवृत्त्यांबाबतचे सुधारित नियम सोबतच्या सहपत्रांत दर्शविल्याप्रमाणे मंजूर करण्यांत येत आहेत.

२. हे नियम १९८५-८६ या शैक्षणिक वर्षापासून अमलांत येतील. सुधारित नियम क्र. [२] व [३] हे १९८४-८५ ह्या शैक्षणिक वर्षापासून अमलांत आणण्याचे आदेश शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक : एसईए १०८२/४१९९/ विशि-३, दिनांक २.१.१९८५ मध्ये दिले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ श्री. व्दा. चित्रे. ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, विज्ञान संस्था, मुंबई.
संचालक, विज्ञान संस्था, नागपूर.
संचालक, विज्ञान संस्था, औरंगाबाद.

..२..

प्राचार्य, शासकीय महाविद्यालये.
मुंबई.

कुलसचिव, मुंबई विद्यापीठ//एस.एन. डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई/
पुणे विद्यापीठ, पुणे/ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर/
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद / नागपूर विद्यापीठ,
नागपूर/ अमरावती विद्यापीठ, /अमरावती.

महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई, नागपूर.

अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

वित्त विभाग.

शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसतीएच १०८२/ ४११९/ विशि-३, दिनांक १३ ऑगस्ट८५ चे सहपत्र.



## शासकीय संशोधन अधिछात्रवृत्त्याचे सुधारित नियम.

नियम क्रमांक : १ :-

प्रतिवर्षी १४ शासकीय संशोधन अधिछात्रवृत्त्या मंजूर केल्या जातील.त्यांची विभागणी खालीलप्रमाणे राहील :-

| | | |
|---|---|---|
| १] | विज्ञान संस्था, मुंबई - | ३ |
| २] | विज्ञान संस्था, नागपूर | ३ |
| ३] | विज्ञान संस्था, औरंगाबाद | ३ |
| ४] | विदर्भ महाविद्यालय, अमरावती. | १ |
| ५] | नागपूर महाविद्यालय, नागपूर. | १ |
| ६] | राज्यातील विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये यामधील विद्यार्थ्यांसाठी. | ३ |
| | एकूण | १४ |

नियम क्रमांक :२:-

अधिछात्रवृत्तीचा कालावधी तीन वर्षाचा राहिल. कोणत्याहि परिस्थितीत हा कालावधी वाढवून दिला जाणार नाही.

नियम क्रमांक: ३:-

अधिछात्रवृत्तीचा दर दरमहा रु. ४००/- राहिल. याशिवाय अधिछात्रांना दरमहा रु. ५०/- याप्रमाणे प्रतिवर्षी रुपये ६००/- सादिलवार खर्चासाठी अनुदान मिळेल.

नियम क्रमांक :४ :-

ज्या विद्यार्थ्यांनी बी.ए. / बी.एस्सी/ बी.एड. ही पदवी भारतातील कोणत्याहि संविधीमान्य विद्यापीठाची प्राप्त केली असेल व भारतातील विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी किंवा भारताबाहेरील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी प्राप्त

...२..

केली असेल व ज्यांचा संविधीमान्य विद्यापीठाच्या पी.एच.डी. किंवा डी.एस्सी, ह्या पदवीसाठी मार्गदर्शकाने स्वीकार केला असेल असा विद्यार्थ्यांना ह्या संशोधन अधिछात्रवृत्त्या देण्यात येतील. ज्या विद्यार्थ्यांनि बी.ए./ बी.एस्सी / बी.एड/ व एम.ए./एम.एस्सी/एम.एड. यापैकी कोणत्याहि एका पदवी परीक्षेत प्रथम श्रेणी प्राप्त केली आहे व अन्य पदवी परीक्षेत किमान व्दितीय श्रेणी प्राप्त केली आहे, त्यांना ह्या अधिछात्रवृत्तीसाठी पात्र समजले जाईल. विज्ञान संस्था, मुंबई, नागपूर, औरंगाबाद येथे जर एखाद्या वर्षी वरील अट पूर्ण करणारे विद्यार्थी उपलब्ध नसतील तर त्यावर्षी ज्या विद्यार्थ्यांनि बी.एस्सी पदवी किमान दुस-या श्रेणीत संपादन केली असेल व एम.एस्सी. पदवी दुस-या श्रेणीत [ पेपर्सव्दारे ] किंवा [ संशोधनाव्दारे ] संपादन केली असेल असे विद्यार्थी संशोधन अधिछात्रवृत्तीसाठी पात्र समजले जातील.

नियम क्रमांक :५ :-

अधिछात्रांनी जो विषय निवडला असेल त्या विषयासाठी विद्यापीठाने मान्यता दिलेल्या मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली अधिछात्रांना पूर्णवेळ संशोधन कार्य करावे लागेल.

नियम क्रमांक: ६ :-

अ] शासकीय संस्थेमधील संशोधन कार्य करणा-या अधिछात्रांनी अधिछात्रवृत्तीसाठी , विहित नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज १४ ऑगस्टपर्यंत संस्थाप्रमुखांकडे पाठवावेत.

ब] विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये यामधील संशोधन कार्य करणा-या अधिछात्रांनी अधिछात्रवृत्तीसाठी, विहित नमुन्यामध्ये, आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज ~~संस्था प्रमुख~~ विद्यापीठामार्फत, शिक्षण संचालक, [उच्च शिक्षण ], महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे १४ ऑगस्ट पर्यंत पाठवावे.

नियम क्रमांक : ७ :-

दरवर्षी सप्टेंबर महिना अखेरीस संशोधन अधिछात्रांची निवड केली जाईल. ही निवड खाली दर्शविलेल्या समित्यांमार्फत केली जाईल.

अ] शासकीय संस्थांमधील अधिछात्रांची निवड करण्यासाठी संस्थेच्या प्रमुखांच्या अध्यक्षतेखाली

चार सभासदांची एक समिती राहिल. इतर तीन सदस्यांची नेमणूक शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांचेकडून केली जाईल.

ब] विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमधील तीन अधिछात्रांची निवड करण्यासाठी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली चार सभासदांची एक समिती राहिल. निवड समितीतील इतर तीन सदस्यांची नेमणूक शासन, शिक्षण संचालक [ उच्च शिक्षण ] यांचे शिफारशीने करील.

वरील निवड समित्या आपल्या शिफारशी शिक्षण संचालक[ उच्च शिक्षण] पुणे यांजकडे पाठवतील. शिक्षण संचालक, [ उच्च शिक्षण ] हया शिफारशी शासनाकडे पाठवतील. अधिछात्रांची गुणवत्तेनुसार निवड करावयाचा अंतिम अधिकार शासनाकडे राहिल.

नियम क्रमांक : ८ :-

अधिछात्रवृत्तीच्या कालावधीत दोन वर्षानंतर सर्व संशोधन अधिछात्रांच्या प्रगतीचे मूल्यमापन संस्थेचे प्रमुख व मार्गदर्शक यांचेकडून केले जाईल. मूल्यमापनानंतर असे आढळून आले की, अधिछात्रांमध्ये संशोधन क्षमतेची उणीव आहे तर संस्था प्रमुखांनी संशोधन अधिछात्रवृत्ती रद्द करण्याबाबत शिक्षण संचालक [ उच्च शिक्षण ] यांचेकडे प्रस्ताव पाठवावा.

नियम क्रमांक: ~~८~~ :- ९

अ] अधिछात्रवृत्तीच्या कालावधीमध्ये अधिछात्रांना जास्तीत जास्त तीस दिवस रजेचा लाभ घेता येईल. यामध्ये रविवार सोडून सार्वजनिक सुट्टयांचा समावेश असेल. तथापि , दिवाळी, व उन्हाळी सुट्टयांचा समावेश नसेल. स्त्री अधिछात्रांना त्यांच्या अधिछात्रवृत्तीच्या कालावधीमध्ये प्रसूती काळासाठी एकदा तीन महिन्यापर्यंत पूर्ण दराने छात्रवृत्ती देण्यात येईल.

ब] अधिछात्रवृत्तीच्या कालावधीमध्ये अध्यापकाचे पद स्वीकारल्यास अधिछात्रास, विशेष बाब म्हणून एक वर्षापर्यंत रजा मंजूर करण्याचे अधिकार शिक्षण संचालक [ उच्च शिक्षण ], पुणे यांना रहातील. ~~मात्र अधिछात्राने स्वीकारलेले अध्यापकाचे पद~~ त्याच

शहरातील शिक्षण संस्थेमध्ये असावे. रजेच्या कालावधीत अधिछात्रास अधिछात्रवृत्ती मिळण्यास पात्र समजले जाणार नाही.

क] अपरिहार्य परिस्थितीत अधिछात्रास अधिछात्रवृत्तीच्या कालावधीमध्ये जास्तीत जास्त तीन महिने रजा मंजूर करण्याचे अधिकार संस्था प्रमुख / मार्गदर्शक यांना रहातील. या रजेच्या कालावधीमध्ये अधिछात्रास अधिछात्रवृत्ती मिळण्यास पात्र समजले जाणार नाही.

ड] वरील [ अ] [ब], व [क] येथे नमूद केलेल्या रजेचा कालावधी अधिछात्रवृत्तीच्या कालामध्ये धरला जाईल.

नियम क्रमांक : १० :-

अधिछात्रास अधिछात्रवृत्तीची मुदत संपण्याआधी अधिछात्रवृत्ती सोडून द्यावयाची असेल तर शिक्षण संचालक, [उच्च शिक्षण] यांची पूर्वसंमती घ्यावी लागेल.

नियम क्रमांक : ११ :-

अधिछात्रवृत्तीच्या कालावधीमध्ये नियम क्रमांक ९[ब] मध्ये तरतूद केल्याप्रमाणे अध्यापकाचे पद वगळता अधिछात्रास कोणतीही इतर पगारी अगर कोणत्याहि तऱ्हेची नियुक्ती, विद्यावेतन, संशोधन अधिछात्रवृत्ती स्वीकारता येणार नाही.

नियम क्रमांक : १२ :-

प्रत्येक वर्षी अधिछात्राने त्यांच्या मार्गदर्शकामार्फत आपला वार्षिक प्रगती अहवाल शिक्षण संचालक [ उच्च शिक्षण], पुणे यांना सादर करावा. अधिछात्रवृत्तीचा कालावधी संपण्याचे वेळी अधिछात्राने शिक्षण संचालक, [ उच्च शिक्षण ] यांना सर्वंकष अहवाल तसेच त्यांचे संशोधन कार्य प्रसिध्द झाले असल्यास, त्याची एक प्रत विनामूल्य सादर करावी.

नियम क्रमांक : १३ :-

शासकीय संस्थांमध्ये संशोधन करणाऱ्या अधिछात्रास शिक्षण शुल्क भरावे लागणार नाही. परंतु जे अधिछात्र अशासकीय संस्थांमध्ये संशोधन करीत असतील त्यांना संस्थेच्या नियमानुसार शिक्षण शुल्क द्यावे लागेल.

नियम क्रमांक : १४ :-

शासकीय संस्थेतील विद्यार्थ्यांची देयके,

शिष्यवृत्तीच्या देयकाच्या नमुन्यामध्ये संस्थेच्या प्रमुखांच्या सहीने दर महिन्यास काढली जातील. त्यावर शिक्षण संचालक, [ उच्च शिक्षण ], यांच्या सहीची आवश्यकता रहाणार नाही. परंतु अशासकीय संस्थेतील विद्यार्थ्यांची देयके संस्था प्रमुखांच्या स्वाक्षरीने तयार करुन त्यावर लेखाधिकारी [ महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग-२ ], शिक्षण संचालनालय, [ उच्च शिक्षण ] यांची प्रतिस्वाक्षरी घेतली जाईल. ही देयके ३१ मार्च पर्यंतच्या कालावधीसाठी मंजूर केली जातील. संस्था प्रमुख प्राप्त झालेली अधिछात्रवृत्तीची रक्कम व्यक्तिगत खात्यामध्ये जमा करतील व त्या रक्कमेचे वाटप विद्यार्थ्यांना दरमहा आगाऊ करतील.

नियम क्रमांक : १५ :-

जर एखाद्या अधिछात्राने काही संयुक्तिक कारणा-साठी संस्था बदलली तर त्याच्या अधिछात्रवृत्तीचे स्थानांतर बदली केलेल्या संस्थेमध्ये करण्यांत येईल.